जलयुक्त शिवार अभियानांतर्गत निवडण्यात आलेल्या गावांचा "जलपरिपूर्णता अहवाल" (Exit Protocol) अंतिम करण्याच्या कार्यपध्दतीबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**मृद व जलसंधारण विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : जशिअ- २०१६/प्र.क्र.३२३/जल-७**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: १० ऑक्टोबर, २०१७

**<u>वाचा</u> :- शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग,**

१. **क्रमांक :- जलअ-२०१४/प्र.क्र.२०३/जल-७, दिनांक ५ डिसेंबर, २०१४ दि. २८ जानेवारी, २०१५ दिनांक ३ मार्च, २०१५ व दि. १ मार्च, २०१६**
२. **क्रमांक :- जलशि-२०१६/प्र.क्र.५७४/जल-७, दि. २६ ऑक्टोबर, २०१६**

**<u>प्रस्तावना</u> :-**

टंचाईमुक्त महाराष्ट्र-२०१९ अंतर्गत टंचाई परिस्थितीवर कायमस्वरुपी मात करण्यासाठी राज्यात दिनांक ५ डिसेंबर २०१५ च्या शासन निर्णयान्वये जलयुक्त शिवार अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानाच्या माध्यमातून दरवर्षी ५००० गावे टंचाईमुक्त करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आलेले आहे. जलयुक्त शिवार अभियानांतर्गत केलेल्या कामामधून गावे जलपरिपूर्ण घोषित करण्याबाबतची कार्यपध्दती निश्चित करण्यासाठी मुख्य अभियंता, विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रम, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली तांत्रिक समिती दि. १८ जुलै, २०१६च्या शासन परिपत्रकान्वये गठित करण्यात आली होती. सदर समितीच्या अहवालाच्या अनुषंगाने जलयुक्त शिवार अभियानात निवड करण्यात आलेल्या गावांचा जलपरिपूर्णता अहवाल अंतिम करण्याबाबतची कार्यपध्दती निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय**

राज्यात दिनांक ५ डिसेंबर, २०१४ च्या शासन निर्णयान्वये "जलयुक्त शिवार अभियान" हा कार्यक्रम राबविण्यात येत असून दरवर्षी ५००० गावे टंचाई मुक्त करण्याचे उदिष्ट निश्चित करण्यात आलेले आहे.

२. सदर अभियानंतर्गत गाव निवड केलेनंतर सर्व संबंधित विभागाचे गाव पातळीवरील अधिकारी/कर्मचारी ग्रामस्थासोबत शिवार फेरी घेऊन गाव आराखडा तयार करतात व आराखडयानुसार विविध यंत्रणा मार्फ़त कामे केली जातात. आता सन २०१५-१६ मध्ये निवडलेल्या गावातील कामे पूर्ण झाली आहेत. सदर गावातील झालेल्या कामांचे अनुषंगाने गावाचा जलपरिपूर्णता अहवाल अंतिम करण्याबाबतची कार्यपध्दती खालीलप्रमाणे निश्चित करण्यात यावी.

३. ज्या गावामध्ये पाण्याच्या ताळेबंदानुसार गावाची पाण्याची एकुण गरज व उपलब्ध झालेले पाणी बरोबर येत असल्यास अशी गावे जलपरिपुर्ण (Water Neutral) झाली असे जाहीर करावे. ज्या ठिकाणी वरील सुत्र जुळत नाही अशा ठिकाणी गाव आराखड्यानुसार कामे पुर्ण करावी. तसेच पाण्यांचा कार्यक्षम वापर होण्याकरीता उपाययोजना घेण्यात याव्यात.

**४. जलपरिपूर्णता अहवाल तयार करतेवेळी तो खालील प्रमाणे ४ भागामध्ये करण्यात यावा.**

**भाग १ :** गाव आराखडयामध्ये नमूद केलेप्रमाणे गावांची अभियानात निवड करण्यापूर्वीची सर्व प्राथमिक माहिती (भौगोलिक माहिती, लोकसंख्या, जनावरे तसेच एकूण क्षेत्र, पिक परिस्थिती - लागवडीखालील क्षेत्र (पिकनिहाय व हंगामनिहाय), अस्तित्वातील विहिरी, विंधन विहिरी, सरासरी पाणी पातळी, गावातील भौतिक सुविधा इ.) भाग - १ मध्ये नमुद करावी.

**भाग २ :** जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत तयार केलेला गाव आराखडा भाग - २ म्हणुन जोडण्यात यावा.

**भाग ३ :** गावाची वार्षिक आवश्यक पाण्याची गरज, पावसाच्या नोंदी आधारे गावामध्ये पडणाऱ्या पावसामुळे उतारानूसार अपधाव मिळणारा अपधाव अभियानापूर्वी जलसंधारण कामामुळे अडविण्यात आलेला अपधाव व शिल्लक अपधाव, उपलब्ध अपधाव अडविण्याच्या दृष्टिने अभियानामध्ये घेण्यात आलेल्या कामांचा पुर्ण तपशिल देण्यात यावा. कामनिहाय पुर्णत्वाच्या प्रमाणपत्राची प्रत जोडण्यात यावी. यामध्ये पाणीसाठ्यासह संपुर्ण तपशिल देण्यात यावा. तसेच जी कामे लोकसहभागातून करण्यात आली आहेत. त्याचा पुढील प्रमाणे स्वतंत्र तपशील देण्यात यावा.

| १ | २ | ३ | ४ | ५ |
|---|---|---|---|---|
| कामाचे नाव | शासकीय खर्च | लोकसहभागाची रक्कम | एकुण खर्च | निर्माण झालेला पाणीसाठा |
| | | | | |

**भाग ४ :** घेण्यात आलेल्या कामामुळे भूजल स्थिती पातळी, पिक पध्दती, लागवडीखालील वाढलेले क्षेत्र यामध्ये झालेल्या फरकाची नोंद घ्यावी.

अभियानामध्ये गाव निवड होण्यापूर्वी तसेच अभियानामध्ये घेण्यात आलेल्या सर्व कामांची यादी करावी त्यामध्ये कामाचे स्थळ, त्यावर झालेला खर्च, कोणत्या निधी स्रोतामधून खर्च केला, यांची नोंद घ्यावी

उपरोक्त सर्व नोंदी घेण्यासाठी या शासन निर्णयासोबत जोडलेल्या परिशिष्ट चा वापर करावा.

## ५. जलपरिपूर्णता अहवाल तयार करणे व जाहीर करणे संदर्भातील बाबी

५.१) उपरोक्त परिच्छेद क्र. ४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सोबत जोडलेल्या परिशिष्टानुसार तालुका स्तरीय समितीमार्फत जलपरिपूर्णता अहवाल तयार करावा.

५.२) अहवाल तयार केल्यानंतर त्यावर तालुकास्तरीय समितीच्या अध्यक्षाची व सदस्य सचिव यांची स्वाक्षरी घ्यावी.

५.३) जलपरिपुर्णता अहवाल सादर करण्याकरिता १ मे, १५ ऑगस्ट, २६ जानेवारी २ ऑक्टोंबर, किंवा विशेष ग्रामसभा बोलविण्यात यावी. ग्रामसभेमध्ये तालुकास्तरीय अधिकारी/यंत्रणा यांच्या उपस्थितीमध्ये जलपरिपुर्णता अहवाल ग्रामपंचायतीस हस्तांतरीत करावा.

## ६. वरील प्रमाणे बोलाविण्यात आलेल्या विशेष ग्रामसभेमध्ये खालील बाबीवर चर्चा करून तसा ठराव पारित करण्यात यावा.

I. निर्माण होणारा पाणीसाठा कोणत्याही एका शेतकऱ्यास सिंचनासाठी थेट उचलता येणार नाही. या पाणीसाठयावर सर्व गावांचा हक्क असल्याने यावर सर्वांचे नियंत्रण असणे आवश्यक आहे.

II. महाराष्ट्र भूजल विकास व व्यवस्थापन अधिनियमन २००९ व त्यानुसार अंमलात आलेल्या नियमानुसार तरतुदीचे पालन करण्याबाबत प्रोत्साहित करावे.

III. गावात जुन्या बोअरवेल वापरावर आणि, नवीन बोअर खोदाईवर पूर्णत: बंदी घालणे आवश्यक आहे. याबाबत सर्व ग्रामस्थांनी एकत्र येऊन ग्राम सभेमध्ये असा धारणात्मक निर्णय घ्यावयाचा आहे. पिण्याच्या पाण्यासाठी आवश्यकतेनुसार बोअरवेल खोदाई करणेबाबत ग्रामसभेने निर्णय घ्यावयाचा आहे.

IV. पाणलोटामध्ये निर्माण केलेल्या सर्व उपचारांची देखभाल दुरुस्तीसाठी कायमस्वरुपी निधीची आवश्यकता भासणार आहे. यासाठी वैयक्तिक उपचाराची देखभाल ही संबंधित शेतमालकाने करावयाची आहे. सार्वजनिक उपचाराच्या देखभालीसाठी आवश्यक असलेला निधी हा लोकसहभागातून जमा करावा. ज्या शेतक-यांना प्रत्यक्ष फायदा होतो अशा शेतक-याकडून अतिरिक्त रक्कम घेण्यास हरकत नाही. यासाठी ग्रामसभा आयोजित करुन किती कर घ्यावा याबद्दल धोरण निश्चित करावे.

V. उपलब्ध पाणीसाठा विचारात घेऊन त्या ठिकाणची हंगाम निहाय पिक पध्दती काय असावी यावाबत कृषि विभाग / कृषि विद्यापिठाच्या सल्ल्याने पिक आराखडा तयार करुन अंमलबजावणी करण्यात यावी.

VI. मुलस्थानी मृद व जलसंधारण या तंत्रज्ञानाच्या वापरासाठी कृषि विद्यापिठाच्या विभागासाठी सुसंगत शिफारशी व उपचार पध्दतीच्या अंमलबजावणीवर जास्तीत जास्त भर द्यावा.

VII. विहीरीच्या माध्यमातून उपलब्ध होणारे पाणी हे सुक्ष्म सिंचनाव्दारे वापरण्यावर भर देण्यात यावा.

VIII. गावामध्ये उपलब्ध होणाऱ्या पाणीसाठयामधून कमी पाण्यावर जास्त उत्पन्न देणारी पिके घेणे आवश्यक आहे. जास्त पाणी लागणारी पिके लागवड करणेपासून परावृत्त करणेबाबत जनजागृती करावी.

IX. विहिर खोदाई ६० फुटापेक्षा जास्त करण्यावर निर्बंध घालावेत. नवीन विहीर खोदणाऱ्या शेतकऱ्यांना याची जाणीव करुन घ्यावी.

X. आज जरी गाव जलपरिपूर्ण झाले तरी गावाची पाण्याची गरज वाढेल त्याप्रमाणात व गावामध्ये अडवण्यास शिल्लक असणाऱ्या अपधावानुसार यापूढे गावात जलसंधारणाची कामे घेता येतील.

XI. भविष्यातील वाढती लोकसंख्या, त्यांचेसाठी आवश्यक अन्नधान्य उत्पादनासाठी पिके व पिकांसाठी आवश्यक पाणी, पर्जन्यमानातील खंड, अनियमितता व त्यामुळे निर्माण होणारे पाण्याचे दुर्भिक्ष या बाबींवर तसेच पाण्याबाबतचे महत्त्व नवीन पिढीला कळण्यासाठी त्यांना जलसाक्षर (Water Literate) करणे आवश्यक आहे. यासाठी “जल साक्षरता” सारखे उपक्रमाचे आयोजन करावे.

XII. उपरोक्त सर्व (I ते XI ) सुचनांचे पालन करण्याची जबाबदारी ग्राम पंचायत अंतर्गत अस्तित्वात असलेल्या पाणी पुरवठा व स्वच्छता समितीकडे सोपविण्यात यावी

७. जलपरिपुर्णता अहवालाची एक प्रत (Soft व Hard) जिल्हाधिकारी, प्रांत अधिकारी (उपविभागीय अधिकारी महसूल), तहसिलदार व ग्रामपंचायत स्तरावर ठेवण्यात यावी.

८. गावामध्ये निर्माण झालेल्या जलसंधारणाच्या संसाधनाची देखभाल दुरुस्ती आवश्यक आहे त्याकरिता जलयुक्त शिवार अभियान योजनेतील जलपरिपुर्ण झालेल्या गावांना प्रोत्साहनात्मक निधी शासनाकडून उपलब्ध करून देण्यात येईल. सामुहिक उपचारांच्या देखभाल दुरुस्तीसाठी ग्रामपंचायत निधी/लोकसहभागातून काही निधी राखून ठेवला तर तेवढाच निधी **(दरवर्षी** रुपये २.०० लक्ष मर्यादेत) शासनाकडून प्रोत्साहन निधी म्हणून **लेखाशिर्ष ४४०२ २६८१ मधून** उपलब्ध करुन देण्यात येईल, हा निधी अस्तिवातील कामाच्या देखभाल दुरुस्तीसाठी तसेच नविन जलसंधारण कामांसाठी वापरण्यात येईल. परिच्छेद क्रमांक ६ प्रमाणे ज्या गावच्या ग्रामसभेमध्ये ठराव परित होतील व त्याचे अनुपालन करतील ती गावे प्रोत्साहन निधीकरीता पात्र असतील.

९. ग्रामपंचायतीकडून/लोकसभागातून या कामासाठी उपलब्ध निधीचा ठराव घेवून ग्रामपंचायत शासनाकडून प्राप्त होणा-या निधीची मागणी गट विकास अधिका-यामार्फ़त मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सादर करेल. सदर निधी मागणी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांनी जिल्हाधिकारी यांचे मार्फ़त शासनास सादर करावी. उपलब्ध आर्थिक तरतुदीच्या अधिन राहून शासनाकडून निधी ग्रामपंचायतीना उपलब्ध करून देण्यात येईल.

१०. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक - ३७५/२०१७ व्यय १५ दिनांक २८ ऑगस्ट २०१७ अन्वये प्राप्त झालेल्या मान्येतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१७१०१०१२१६५७७८२६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Narayan Karad

Digitally signed by Narayan Karad
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=RD and WCD Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=fc35aa8ffade5bb6105200693c60a32b755f7e67f72965b8dd57adaa570981f1, cn=Narayan Karad
Date: 2017.10.12 11:27:26 +05'30'

सोबत: वरीलप्रमाणे

**(ना.श्री.कराड)**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१) मा. राज्यपाल यांचे सचिव
२) मा.सभापती विधान परिषद यांचे सचिव,
३) मा.अध्यक्ष विधान सभा यांचे सचिव,
४) मा. विरोधी पक्ष नेता विधानसभा/विधान परिषद
५) सर्व विधानसभा/विधानपरिषद सदस्य
६) मा.मुख्यमंत्री यांचे सचिव,
७) मा.मंत्री (जलसंधारण) यांचे खाजगी सचिव,
८) मा.राज्यमंत्री (जलसंधारण) यांचे खाजगी सचिव,
९) सर्व मा.मंत्री व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
१०) सर्व मा.विधान परिषद / विधान सभा सदस्य, विधान भवन,
११) मा.मुख्य सचिव यांचे उप सचिव,
१२) सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव,
१३) प्रधान मुख्य वनसंरक्षक व महासंचालक, सामाजिक वनीकरण, पूणे
१४) आयुक्त, मृद व जलसंधारण महाराष्ट्र राज्य औरंगाबाद
१५) आयुक्त (कृषि) महाराष्ट्र राज्य, सर्व विभागीय आयुक्त,पूणे
१६) संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, कृषि आयुक्तालय,पूणे
१७) अपर मुख्य कार्यकारी अधिकारी, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पूणे

१८) मुख्य अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण), महाराष्ट्र राज्य, पूणे
१९) संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पूणे
२०) संचालक, महाराष्ट्र सुदूर संवेदन केंद्र, नागपूर
२१) सर्व जिल्हाधिकारी,
२२) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
२३) सर्व विभागीय कृषि सहसंचालक,
२४) सर्व अधीक्षक अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण) मंडळ,
२५) संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई,
२६) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, (प्रसिध्दीकरीता)
२७) सर्व जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी,
२८) सर्व सहसंचालक, सामाजिक वनीकरण,
२९) सर्व मुख्य वनसंरक्षक / सर्व उप वनसंरक्षक,
३०) महालेखापाल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र राज्य १ व २,
३१) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य १ व २,
३२) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
३३) सर्व मंत्रालयीन विभाग,
३४) सर्व सहसचिव /उपसचिव /अवर सचिव /कार्यासन अधिकारी, जलसंधारण विभाग
३५) कार्यासन जल-११ व कार्यासन जल-१९ जलसंधारण विभाग, मंत्रालय
३६) निवडनस्ती जल-७.

# परिशिष्ट

## जलयुक्त शिवार अभियान

## गावाचा जल परिपूर्णता अहवाल

**१. पायाभूत माहिती :**

भौगोलिक क्षेत्र - हेक्टर

लोकसंख्या - संख्या

पर्जन्यमान/पाऊस - मिमि

| अ.क्र. | बाब | अभियानापूर्वी | अभियान राबविल्यानंतर |
|---|---|---|---|
| १ | लागवडीखालील क्षेत्र | | |
| २ | जनावरे/शेळया-मेंढया संख्या | | |
| ३ | कुक्कुटपालन/पक्षी संख्या | | |
| ४ | विहीरींची संख्या (Open Well) | | |
| ५ | विंधन विहीरींची संख्या (Bore Well) | | |

**२. पावसापासून मिळणारा अपधाव :-**

| अ.क्र. | पाणलोटाचा प्रकार | क्षेत्र (हे.) | प्रति हेक्टर अपधाव (टी.सी.एम.) | एकूण अपधाव (टी.सी.एम.) |
|---|---|---|---|---|
| १ | २० टक्के पेक्षा जास्त | | | |
| २ | ५ ते २० टक्के | | | |
| ३ | ५ टक्के पेक्षा कमी | | | |
| | एकूण | | | |

३. **अभियानांतर्गत कामांचा आराखडा :**

**अ) कामाची स्थिती**

| **अ.क्र.** | **प्रस्तावित कामे संख्या** | |
|---|---|---|
| १ | पूर्ण कामे | |
| २ | अपूर्ण कामांची संख्या | |
| ३ | उपलब्ध निधी | |
| | प्रत्यक्ष खर्च | |

**ब) अभियाना अंतर्गत करण्यात आलेली जलसंधारणाची कामे**

| **अ.क्र.** | **कामाचा प्रकार** | **प्रस्तावित** | | **प्रत्यक्ष** | |
|---|---|---|---|---|---|
| | | **संख्या** | **अडविलेला अपधाव (टी.सी.एम.)** | **संख्या** | **अडविलेला अपधाव (टी.सी.एम.)** |
| १ | सलग समतल चर | | | | |
| २ | माती नाला बांध | | | | |
| ३ | सिमेंट नाला बांध | | | | |
| ४ | अर्धन बांध | | | | |
| ५ | अनगड दगडी बांध | | | | |
| ६ | जुनी भात शेती | | | | |
| ७ | गॅबियन बंधारा | | | | |
| ८ | वळण बंधारा | | | | |
| ९ | शेततळे | | | | |
| १० | गाळ काढणे | | | | |
| ११ | पाझर तलाव | | | | |
| १२ | सिंचन तलाव | | | | |
| १३ | गाव तलाव | | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १४ | शिवकालीन तलाव | | | | |
| १५ | मध्यम प्रकल्प | | | | |
| १६ | मोठा प्रकल्प | | | | |
| १७ | भूजल सर्वेक्षण विभागाचे उपचार | | | | |
| १८ | नाला रुंदीकरण/खोलीकरण | | | | |
| १९ | इतर | | | | |
| | एकूण | | | | |

**क) अभियानापूर्वी करण्यात आलेली जुनी जलसंधारणाची कामे**

| अ.क्र. | कामाचा प्रकार | संख्या | अडविलेला अपधाव (टी.सी.एम.) |
|---|---|---|---|
| १ | सलग समतल चर | | |
| २ | माती नाला बांध | | |
| ३ | सिमेंट नाला बांध | | |
| ४ | अर्धन बांध | | |
| ५ | अनगड दगडी बांध | | |
| ६ | जुनी भात शेती | | |
| ७ | गॅबियन बंधारा | | |
| ८ | वळण बंधारा | | |
| ९ | शेततळे | | |
| १० | गाळ काढणे | | |
| ११ | पाझर तलाव | | |
| १२ | सिंचन तलाव | | |
| १३ | गाव तलाव | | |

| | | | |
|---|---|---|---|
| १४ | शिवकालीन तलाव | | |
| १५ | मध्यम प्रकल्प | | |
| १६ | मोठा प्रकल्प | | |
| १७ | भूजल सर्वेक्षण विभागाचे उपचार | | |
| १८ | नाला रुंदीकरण/खोलीकरण | | |
| | इतर | | |
| | एकूण | | |

**ड) आराखड्यामध्ये समाविष्ट परंतू न झालेली कामे**

| **अ.क्र.** | **सुरु न केलेल्या कामांची संख्या** | **आवश्यक निधी** | **काम पूर्ण झाल्यास अडणारा अपधाव** |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |

**इ. एकुण अडवलेला अपधाव**

| अभियानापूर्वी | अभियानानंतर | उर्वरित |
|---|---|---|
| | | |

**५. भूजलाची स्थिती**

| तपशील | संख्या | अभियानापूर्वी | | अभियानानंतर | | पाणी पातळीतील वाढ (मी.) मागील ५ वर्षातील सरासरी पातळीच्या तुलनेत |
|---|---|---|---|---|---|---|
| | | पावसाळयापूर्वी सरासरी पाण्याची पातळी(मी.) | पावसाळयानंतर सरासरी पाण्याची पातळी (मी.) | पावसाळयापूर्वी सरासरी पाण्याची पातळी(मी.) | पावसाळयानंतर सरासरी पाण्याची पातळी (मी.) | |
| विहीरी (Open Well) | | | | | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| बोअर वेल (Bore Well) | | | | | | |

## ६. पिकाखालील क्षेत्र व उत्पादकता

| हंगाम | प्रमुख पिके | अभियानापूर्वी | | अभियानानंतर | | वाढ/घट |
|---|---|---|---|---|---|---|
| | | क्षेत्र (हे.) | उत्पादकता (किला/हे.) | क्षेत्र (हे.) | उत्पादकता (किला/हे.) | |
| खरीप | १ | | | | | |
| | २ | | | | | |
| | ३ | | | | | |
| | ४ | | | | | |
| | ५ | | | | | |
| रब्बी | १ | | | | | |
| | २ | | | | | |
| | ३ | | | | | |
| | ४ | | | | | |
| | ५ | | | | | |
| उन्हाळी | १ | | | | | |
| | २ | | | | | |
| | ३ | | | | | |
| | ४ | | | | | |
| | ५ | | | | | |
| नगदी | १ | | | | | |
| | २ | | | | | |
| | ३ | | | | | |
| | ४ | | | | | |
| | ५ | | | | | |
| भाजीपाला | १ | | | | | |
| | २ | | | | | |
| | ३ | | | | | |
| | ४ | | | | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | ५ | | | | | |
| फळ | १ | | | | | |
| | २ | | | | | |
| | ३ | | | | | |
| | ४ | | | | | |
| | ५ | | | | | |
| फुल | १ | | | | | |
| | २ | | | | | |
| | ३ | | | | | |
| | ४ | | | | | |
| | ५ | | | | | |
| एकूण | | | | | | |

**७. गावांचा मंजूर आराखड्यामधील नमूद पाण्याचा ताळेबंद**

**अ) पावसापासून मिळणारा अपधाव ........टी.सी.एम.**
**आ) गावाची पाण्याची एकूण गरज ........टी.सी.एम.**
**इ) गावातील जलसंधारण उपचारामुळे अडविलेला अपधाव ........टी.सी.एम.**
**ई) गावातील पाण्याचा ताळेबंद**
अडविलेला अपधाव एकूण तुलनेत कमी/जास्त (आ-इ) .........टी.सी.एम.

**८. जलपरिपूर्णता टिकवून ठेवण्यासाठी उपाययोजना:**

जलसाक्षरता -

भूजल व्यवस्थापन-

पिक व्यवस्थापन-

सूक्ष्म सिंचन-

सद्यस्थितीत गाव जलपरिपूर्ण आहे/नाही.

..........................................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

तालुका कृषी अधिकारी
सही/शिक्का

उपविभागीय अधिकारी (प्रांत)
सही/शिक्का

ग्रामसभा झालेनंतर खालील स्वाक्षरी

कृषिसेवक/कृषी सहाय्यक

ग्रामसेवक

सरपंच